मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड शहरातील 1,609 खड्डे बुजवले असल्याचा महापालिकेचा दावा..!

## पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची मोहीम महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत वेगाने सुरू आहे



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची मोहीम महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत वेगाने सुरू आहे. नागरिक, लोकप्रतिनिधी आणि विविध माध्यमांतून येणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेतली जात आहे. संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत पाहणी करून आवश्यकतेनुसार खड्डे बुजविण्याचे काम केले जात आहे. शहरात रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत आतापर्यंत २,१६४ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी १,६०९ खड्डे बुजविण्यात आले असल्याचा दावा करण्यात आला आहे. उर्वरित ५५५ खड्ड्यांची दुरुस्ती सुरू आहे.

महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत शहरातील विविध रस्त्यांची देखभाल आणि दुरुस्ती केली जाते. खड्ड्यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे पथक त्या ठिकाणी जाऊन पाहणी करते. खड्ड्याचा आकार, खोली, रस्त्याची स्थिती, वाहतुकीची वर्दळ आणि पावसाची परिस्थिती याचा विचार करून दुरुस्तीसाठी योग्य साहित्य निवडले जाते. त्यानंतर खड्डा बुजवून कामाची नोंद केली जाते

यामध्ये तक्रार प्राप्त → ठिकाणाची पाहणी → खड्ड्याची स्थिती तपासणी → योग्य साहित्याची निवड → खड्डा बुजविणे → कामाची पाहणी व नोंद, अशा पद्धतीने ही कार्यवाही केली जात आहे. आतापर्यंत बुजविण्यात आलेल्या १,६०९ खड्ड्यांपैकी ५५६ खड्डे कोल्ड मिक्स, २३ बीबीएम, ७५४ जीएसबी, १२० पेव्हिंग ब्लॉक आणि १५६ खड्डे काँक्रिटच्या माध्यमातून बुजविण्यात आले आहेत.

शहरातील प्रत्येक प्रभागात खड्डे बुजविण्यासाठी स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली आहेत. या पथकांना आवश्यक साहित्य, साधनसामग्री, मनुष्यबळ आणि स्वतंत्र वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ही पथके प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांची पाहणी करून आढळणारे खड्डे तातडीने बुजवित आहेत. सध्या पावसाळा सुरू असल्याने डांबर प्लांट बंद आहे. त्यामुळे कोल्ड मिक्स, बीबीएम, जीएसबी, पेव्हिंग ब्लॉक आणि काँक्रिट यांचा वापर करून खड्डे बुजविण्यात येत आहेत. मात्र, सततच्या पावसामुळे काही ठिकाणी रस्त्यांवर पुन्हा पाणी साचते. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात बुजविलेले काही खड्डे पुन्हा खराब होण्याची शक्यता असते. अशा ठिकाणी परिस्थितीनुसार पुन्हा दुरुस्ती केली जात आहे.

> **पावसाची तीव्रता आणि सातत्याने होणाऱ्या पावसामुळे काही ठिकाणी रस्त्यांवर पुन्हा पाणी साचून तात्पुरत्या स्वरूपात बुजविलेले खड्डे खराब होत आहेत. नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी उपलब्ध साहित्याच्या माध्यमातून खड्डे बुजविण्याचे काम वेगाने सुरू आहे. पावसाची मोठी उघडीप मिळाल्यानंतर दुरुस्तीची कामे अधिक प्रभावीपणे केली जातील. तसेच पावसाळ्यानंतर डांबर प्लांट सुरू झाल्यावर आवश्यक त्या ठिकाणी कायमस्वरूपी डांबरीकरण करण्यात येईल.**
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**

> **रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याबाबत संबंधित यंत्रणांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. प्राप्त तक्रारींचे वेळेत निराकरण करण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंत्यांची आहे. विभागप्रमुखांनी या कामावर नियमित नियंत्रण ठेवण्याबाबत तसेच तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या अभियंत्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई प्रस्तावित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.**
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# नाशिक फाटा-पिंपरी महामार्गावर अतिक्रमणांचा विळखा

## पदपथावर हातगाड्या, रस्त्यावर अस्ताव्यस्त पार्किंग; रविवारच्या गर्दीत वाहतूक कोंडीसह अपघाताचा धोका



**पिंपरी | प्रतिनिधी**

नाशिक फाटा ते पिंपरी दरम्यानच्या जुन्या पुणे-मुंबई महामार्ग वर्दळीचा असूनही, लगतच्या पदपथावरच छोट्या व्यावसायिकांनी आपली दुकाने थाटली आहेत. या ठिकाणी खरेदीसाठी येणारे नागरिक आपली वाहने अस्ताव्यस्तपणे रस्त्यावरच उभी करत असल्याने इतर वाहनचालकांना मात्र वाहतूक कोंडीस सामोरे जावे लागत आहे.

सुटीच्या दिवशी विक्रेत्यांकडे होणारी गर्दी महामार्गावरील वाहतुकीसाठी अडथळा ठरत असल्याचे चित्र दर रविवारी पहायला मिळाले. महामार्गाच्या कडेला विविध वस्तू विक्रीसाठी हातगाड्या लावण्यात आल्याने नागरिकांचीही मोठी गर्दी होते. अनेक दुचाकीस्वार येथे खरेदीनिमित्त अचानक ब्रेक मारून वाहन थांबवतात. त्यामुळे मागून येणाऱ्या वाहनचालकांना अचानक वेग कमी करावा लागत असून, काही वेळा वाहनांमध्ये धडक होण्याची शक्यता निर्माण होते.

एकीकडे महामार्गावरून वेगाने वाहतूक सुरू असताना दुसरीकडे रस्त्याच्या कडेला बिनधास्तपणे सुरू असलेली विक्री आणि खरेदीची लगबग यामुळे महामार्ग की बाजारपेठ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. रविवार सुटीचा दिवस असल्याने नेहमीपेक्षा अधिक नागरिक खरेदीनिमित्त घराबाहेर पडत असल्याने या अतिक्रमणांचा वाहतुकीवर परिणाम आणखी जाणवत आहे.

हातगाड्यांवरील वस्तू पाहण्यासाठी वाहनचालक अचानक ब्रेक लावत असल्याचे अनेकदा दिसून येते. काही जण आपली वाहने थेट रस्त्याच्या कडेला उभी करून खरेदीसाठी थांबतात. त्यामुळे वाहतुकीचा वेग कमी होण्याबरोबरच मागून येणाऱ्या वाहनांना अचानक परिस्थितीचा सामना करावा लागतो. दुचाकीस्वारांसाठी तर ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरू शकते.

महामार्गालगत अतिक्रमण वाढत असताना संबंधित यंत्रणांचे याकडे कितपत लक्ष आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विक्रेत्यांना हटविण्याची कारवाई झाली तरी काही दिवसांत पुन्हा त्याच ठिकाणी हातगाड्या उभ्या राहत असल्याचे चित्र अनेकदा दिसते. त्यामुळे केवळ कारवाईचा दिखावा न करता महामार्गाच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे.

# मोशी कचरा डेपोच्या बफर झोनमध्ये बिनधास्त प्लॉटिंग

## कचरा डेपोच्या भिंतीलगतच जागांची विक्री; दुर्घटनेचा धोका वाढूनही महापालिका प्रशासनाची डोळेझाक

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या मोशी कचरा डेपोचा १०० मीटर अंतराच्या परिघात बफर झोन आहे. त्या प्रतिबंधित क्षेत्रात मोठ्या संख्येने अनधिकृत बांधकामे होत आहेत. तसेच, त्या परिसरात प्लॉटिंग करून जागेची बिनधास्तपणे विक्री सुरू आहे. बफर झोनच्या धोकादायक क्षेत्रात लोकवस्ती वाढत असल्याने मोशी डेपोमध्ये कचऱ्याचे डोंगर कोसळून झालेली दुर्घटना घडण्याचा धोका वाढला आहे. असे असले तरी, झोपेचे सोंग घेतलेल्या महापालिका प्रशासनाकडून कारवाईबाबत डोळेझाक केली जात असल्याचे धक्कादायक चित्र आहे.



केंद्र सरकारच्या आणि राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कचरा डेपोपासून बफर झोनचे अंतर ५०० मीटर (अर्धा किलोमीटर) निश्चित करण्यात आले होते. मोशी परिसरातील खानदेशनगर, आदर्शनगर, कल्याणनगर, तापकीरनगर या भागांतील वाढती लोकवस्ती लक्षात घेऊन, राज्य सरकारने २०१५-२०१६ मध्ये विशेष अधिसूचना जारी करून या बफर झोनची हद्द कमी करत ती १०० मीटर इतकी केली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरोग्याच्या कारणास्तव हा बफर झोन कमी करण्यास विरोध दर्शवला होता. हद्द कमी झाल्याने रहिवाशांना दिलासा मिळाला. मात्र, बफर झोनमधून वगळलेल्या ४०० मीटर अंतरातील मोकळ्या जागेसह कचरा डेपोच्या भिंतीपर्यंत प्लॉटिंग करून विक्री सुरू आहे. यासाठी दगड-खाणींसह नैसर्गिक प्रवाह भराव टाकून बुजवले आहेत. त्यासंदर्भात पर्यावरणप्रेमींनी वारंवार तक्रार करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे.

बफर झोनचा नियमाकडे दुर्लक्ष करत, कचरा डेपोच्या लगतच जागेवर अनधिकृत प्लॉटिंग करण्यात आले आहे. ती जागा एक एक गुंठ्याने तुकडे करून विकली जात आहे. त्यासाठी परिसरात कार्यालये थाटण्यात आली आहेत. शहरातील इतर भागांच्या तुलनेत कमी दर असल्याने तसेच, आजूबाजूला बरीच लोकवस्ती असल्याने सर्वसामान्य तसेच, शहराबाहेरील नागरिक भुलतात. ते जागा खरेदी करतात आणि घर बांधतात

मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळून ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तर,अनेक कर्मचारी जखमी झाले. त्यामुळे कचरा डेपो धोकादायक झाला आहे. त्या दुर्घटनेनंतर बफर झोनच्या सुरक्षेचा आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्याबाबत महापालिका प्रशासन गंभीर नसल्याचे दिसत आहे.मोशी कचरा डेपोप्रमाणे दुर्घटना घडू नये, म्हणून महापालिकेकडून दक्षता घेतली जात आहे. बफर झोनमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कोणत्याही अनधिकृत बांधकामांस अभय दिले जाणार आहे. मतदार पडताळणी मोहीम (एसआरए) पूर्ण झाल्यानंतर पूर्वीप्रमाणे धडक कारवाई केली जाणार आहे, असे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले.

### पर्यावरण नियमांचे उल्लंघन

» महापालिकेचे प्रशासन तसेच, क्षेत्रीय अधिकारी या गंभीर प्रकाराकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचे चित्र आहे. सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवादाचे आदेश तसेच, पर्यावरण नियमांचे सर्रासपणे उल्लंघन केले जात आहे. डेपोशेजारीच अनधिकृत घरे बांधल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. कचऱ्याची दुर्गंधी, लिचेड हे विषारी सांडपाणी, डास, माशा व पक्ष्यांचा उपद्रव्य वाढला आहे.

### अनधिकृत बांधकामांना नोटिसा दिल्याचा दावा

» मोशी कचरा डेपो परिसरासह फ क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकाम झाल्यास नोटिसा बजावण्यात येत आहे. बफर झोनच्या परिसरात पूर्वी जुनी बांधकामे होती. बफर झोनची हद्द ४०० मीटरने कमी झाल्याने ती बांधकामे झोनच्या बाहेर गेली आहेत, असे फ क्षेत्रीय अधिकारी परशुराम वाघमोडे यांनी सांगितले.

# एमईए पिंपरी-चिंचवडच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त पुनावळेत भव्य वृक्षारोपण अभियान; 2,000 रोपांची लागवड

## ऑक्सिजन पार्कला हरित विकासाची चालना, 300 हून अधिक सदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

मराठा एंटरप्रेन्युअर्स असोसिएशन (एमईए), पिंपरी-चिंचवड यांच्या प्रथम वर्धापनदिनाचे औचित्य साधून पुनावळे येथील वन विभागाच्या जागेवर विकसित होत असलेल्या ऑक्सिजन पार्कमध्ये भव्य वृक्षारोपण अभियान उत्साहात पार पडले. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाचा मोलाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमांतर्गत सुमारे २,००० विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या मोहिमेत वड, पिंपळ, आंबा, नारळ, सीताफळ यांसारख्या देशी फळझाडांसह विविध आयुर्वेदिक वृक्षप्रजातींचा समावेश होता. भविष्यात आकारास येणाऱ्या या ऑक्सिजन पार्कमुळे पुनावळे परिसराच्या हरित विकासाला मोठी चालना मिळणार असून, नागरिकांना शुद्ध हवा, समृद्ध जैवविविधता आणि निसर्गरम्य वातावरणाचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे.





या सामाजिक व पर्यावरणपूरक अभियानामध्ये एमईएचे ३०० ते ४०० सदस्य, स्थानिक उद्योजक, त्यांचे कुटुंबीय, नागरिक आणि लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या प्रसंगी एमईएचे अध्यक्ष महेंद्र यादव, यशदा ग्रुपचे संचालक वसंतशेठ काटे, उद्योजक राजूशेठ भिसे, एमईएचे उपाध्यक्ष करंजुले साहेब, विक्रम माने, युवा उद्योजक व भाजप पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सचिव नवनाथ ढवळे, तसेच रावसाहेब पवार, कल्याण काकडे, सौरभ कोकाटे, सुनील शेजल, राजेश कुऱ्हाडे आणि वन विभागाचे अधिकारी राठोड सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना वन अधिकारी राठोड सर यांनी वृक्षप्रजातींचे पर्यावरणीय महत्त्व, ऑक्सिजन निर्मिती, कार्बन डायऑक्साइडचे शोषण आणि वन्यजीव संरक्षणातील वृक्षांची भूमिका यावर सविस्तर प्रकाश टाकला. एमईएचे अध्यक्ष महेंद्र यादव यांनी भविष्यातही अशाच प्रकारे सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबवले जातील, अशी ग्वाही दिली. नवनाथ ढवळे यांनी पुनावळे परिसराच्या पर्यावरण संवर्धनासाठी आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल एमईए व वन विभागाचे मनःपूर्वक आभार मानत, हा ऑक्सिजन पार्क परिसरासाठी अमूल्य हरित ठेवा ठरेल असा विश्वास व्यक्त केला. विक्रम माने यांनी आयोजनाबद्दल सर्वांचे अभिनंदन करून आभार मानले.

# चाकणसह पुण्यातील एमआयडीसींबाबत मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

## पावसाळ्यानंतर पायाभूत सुविधांत सुधारणा; चाकणसह पुणे परिसरातील एमआयडीसींचे 'इंडस्ट्रियल टाऊनशिप'मध्ये रूपांतर करण्याचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

चाकणमधील प्रश्न गंभीर असून, सरकारने त्याची दखल घेतली आहे. या संदर्भात एक बैठकही झाली आहे. पावसाळा संपल्यानंतर चाकणमधील सगळ्या पायाभूत सुविधांत सुधारणा केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. याचबरोबर पुण्यातील चाकणसह सर्वच एमआयडीसी क्षेत्रांचे इंडस्ट्रियल टाऊनशिप म्हणजेच औद्योगिक नागरी वसाहतीत रूपांतरित करण्याचे पाऊल उचलण्याचे निर्देश नगर विकास विभाग आणि उद्योग विभागाला त्यांनी दिले.

चाकण औद्योगिक क्षेत्रातून कंपन्या स्थलांतरित होणार असल्याची चर्चा सुरू आहे. यामुळे चाकणमधील जागेच्या टंचाईची समस्या समोर आली. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री बोलत होते. चाकण औद्योगिक क्षेत्र सुमारे सात हजार एकरांवर विस्तारले असून, या क्षेत्राबाहेर तेवढ्याच जागेवर औद्योगिक विस्तार झाला आहे. मात्र, उद्योगांना पायाभूत सुविधांचा अभाव त्रासदायक ठरत आहे.

'चाकणमध्ये तीन वर्षांत पाचशे नव्या कंपन्यांची गुंतवणूक आली आहे. जागेच्या वाढत्या मागणीमुळे आगामी काळात चाकण औद्योगिक क्षेत्राचा सहावा टप्पा विकसित केला जाणार आहे,' अशी माहिती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) दिली.

दरम्यान, राज्य सरकारच्या औद्योगिक नगरी कायद्याचा उल्लेख करून फडणवीस म्हणाले, 'या कायद्यानुसार औद्योगिक क्षेत्रांना नागरी वसाहतीत परावर्तित करावे लागेल. त्यामुळे तेथील पायाभूत सुविधांचा एकात्मिक विकास शक्य होईल. याची सुरुवात पुण्याच्या परिसरातील औद्योगिक क्षेत्रामधून केली जाईल. याबाबत नगरविकास विभाग आणि उद्योग विभागाला निर्देश देण्यात आले आहेत.'

चाकण हे वाहननिर्मितीसह उत्पादन क्षेत्राचे देशातील आघाडीचे केंद्र आहे. जागतिक पातळीवरील अनेक कंपन्या चाकणमध्ये कार्यरत आहेत. या परिसरातील २० लघुउद्योगांनी जागेच्या टंचाईमुळे सातारा जिल्ह्यातील खंडाळा औद्योगिक क्षेत्रात स्थलांतरित होण्याचा इशारा दिला. या लघुउद्योगांनी विस्तारासाठी जागा उपलब्ध नसण्यासह पायाभूत सुविधांची खराब अवस्था आणि वाहतूककोंडी हे प्रश्न उपस्थित केले. चाकण परिसरातून हे लघुउद्योग अद्याप स्थलांतरित झालेले नसून, जागा आणि इतर सुविधा न मिळाल्यास स्थलांतर करावे लागेल, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.



### एमआयडीसीचा सहावा टप्पा विकसित होणार

**» चाकण औद्योगिक क्षेत्रात गेल्या तीन वर्षांत सुमारे पाचशे नव्या कंपन्यांनी गुंतवणूक केली आहे. उद्योगांच्या वाढत्या मागणीमुळे जागेची टंचाई निर्माण झाली असून, त्यावर उपाय म्हणून चाकण औद्योगिक क्षेत्राचा सहावा टप्पा विकसित करण्याची तयारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केली आहे. सुमारे सात हजार एकर क्षेत्रात मुख्य औद्योगिक वसाहत विस्तारली असून, त्याबाहेरही तेवढ्याच क्षेत्रावर औद्योगिक विकास झाला आहे. आगामी काळात नव्या उद्योगांसाठी अतिरिक्त जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे सहाव्या टप्प्याच्या विकासामुळे नवीन गुंतवणूक आकर्षित होण्याबरोबरच स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळण्याची शक्यता आहे.**

### पायाभूत सुविधांत होणार सुधारणा

**» चाकण औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या समस्यांची सरकारने गंभीर दखल घेतली आहे. पावसाळा संपल्यानंतर रस्ते, वाहतूक व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. चाकण परिसरातील उद्योगांना खराब रस्ते, वाहतूककोंडी आणि अपुऱ्या सुविधांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे उद्योगांचे स्थलांतर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने उपाययोजना करण्याचे संकेत दिले आहेत. चाकण हे वाहननिर्मिती आणि उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र असल्याने येथील पायाभूत सुविधा मजबूत करण्याला प्राधान्य दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.**

### इंडस्ट्रियल टाऊनशिपचा प्रस्ताव

**» पुणे परिसरातील चाकणसह सर्व एमआयडीसी क्षेत्रांचे 'इंडस्ट्रियल टाऊनशिप'मध्ये रूपांतर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगरविकास आणि उद्योग विभागाला दिले आहेत. औद्योगिक नगरी कायद्यानुसार औद्योगिक क्षेत्रांचे नागरी वसाहतीत रूपांतर केल्यास पायाभूत सुविधांचा एकात्मिक विकास करणे शक्य होईल. चाकणमधील सुमारे २० लघुउद्योगांनी जागेअभावी सातारा जिल्ह्यातील खंडाळा औद्योगिक क्षेत्रात स्थलांतराचा इशारा दिला आहे. मात्र, चाकणमध्येच जागा आणि सुविधा उपलब्ध झाल्यास स्थलांतराची गरज नसल्याचे उद्योजकांचे म्हणणे आहे. त्यामुळे टाऊनशिपच्या निर्णयामुळे उद्योगांना आवश्यक सुविधा मिळून चाकणचा औद्योगिक विकास अधिक वेगाने होण्याची अपेक्षा आहे.**

# दहावी-बारावी विद्यार्थ्यांना महापालिकेचे अर्थसाहाय्य

## दहावीला 15 हजार, बारावीला 25 हजार रुपये; 17 ऑगस्टपासून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या हद्दीतील दहावी आणि बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने दहावीसाठी मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसाह्य योजना आणि बारावीच्या विद्यार्थांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक अर्थसाह्य योजनेतून पात्र विद्यार्थ्यांना अनुक्रमे १५ हजार, तर बारावीसाठी २५ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात येते.

या योजनांसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया १७ ऑगस्टपासून सुरू होणार असून, ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहेत. महापालिकेकडून दरवर्षी हे शैक्षणिक अर्थसाह्य दिले जात असून, शहरातील सुमारे १२ ते १५ हजार मुलांना त्याचा लाभ मिळतो. या शिष्यवृत्तीसाठी महापालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात सुमारे २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

खुल्या गटातील विद्यार्थ्यांसाठी दहावी किंवा बारावीमध्ये किमान ८० टक्के गुण आवश्यक आहेत. तर राज्य शासन किंवा महापालिका अनुदानित शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना किमान ७० टक्के गुणांची अट आहे. ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या विद्यार्थ्यांसाठी किमान ४५ टक्के गुण, तर कचरावेचक,

बांधकाम कामगार आणि असंघटित कामगारांच्या मुलांसाठी किमान ६५ टक्के गुण आवश्यक आहेत. अर्ज पालकांच्या नावाने ऑनलाइन भरावा लागणार आहे. मूळ कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे तसेच महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे. लाभार्थ्याचे आधारशी संलग्न राष्ट्रीयकृत बँक खाते असणे आवश्यक आहे.



### असे आहे वेळापत्रक

**» १७ ऑगस्ट २०२६ – अर्ज भरण्यास सुरुवात**
**» ३१ डिसेंबर २०२६ – अर्ज भरण्याची अंतिम मुदत**
**» अर्ज संकेतस्थळ – dbt.pmc.gov.in**

# मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पाला संथगती

## प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीसाठी पीएमआरडीएकडून ई-निविदा; प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होणार?

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) क्षेत्रातील मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण योजनेला गेल्या अनेक दिवसांपासून अपेक्षित गती मिळाली नाही. आता या प्रकल्पासाठी व्यवस्थापक सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम कधी सुरू होणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

इंद्रायणी, पवना आणि मुळा-मुठा नदी प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासनाकडून सातत्याने उपाययोजना करून प्रदूषणावर तोडगा काढला जात आहे. पीएमआरडीएच्या वतीनेदेखील हद्दीतील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पाद्वारे विविध उपाययोजना राबविल्या जाणार आहेत. यामध्ये आवश्यक ठिकाणी मलनिस्सारण केंद्र (एसटीपी) उभारले जाणार आहेत.

अनेक ठिकाणी दूषित पाणी नाल्याद्वारे नदीत मिसळत आहे. यासाठी नाल्यांचे प्रदूषित पाणी एकत्रित संकलन करण्यासाठी मलवाहिन्या टाकण्यात येणार आहे. तसेच, जलपर्णी निर्मूलन आणि घन कचरा व्यवस्थापनासारख्या उपाययोजना राबविल्या जाणार आहेत. सध्या इंद्रायणी प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी विषय प्रलंबित आहे.

पवना नदी सुधार प्रकल्पासाठी डीपीआर बनविण्याच्या स्तरावर काम सुरू आहे. तर मुळा-मुठा प्रकल्पासाठी आता व्यवस्थापक सल्लागार नियुक्ती करण्याची काम सुरू आहे. मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी पीएमआरडीएकडून ई-निविदा काढण्यात आली आहे. याबाबतची ई-निविदा नोटीसही प्रसिद्ध करण्यात आली आहे.

निविदा दस्तऐवज महाटेंडर्स संकेतस्थळावरून ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून डाऊनलोड करता येणार आहेत. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्याचे नियोजन असताना, अद्याप प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्याच्या टप्प्यावरच प्रक्रिया असल्याने प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळणार, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे. सल्लागार नियुक्त झाल्यानंतर प्रकल्पाचे नियोजन, तांत्रिक बाबी आणि अंमलबजावणीच्या पुढील प्रक्रियेला वेग येण्याची अपेक्षा आहे. मात्र, निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन सल्लागार प्रत्यक्ष नियुक्त होण्यास आणखी कालावधी लागण्याची शक्यता आहे.



### प्रत्यक्ष कामाला विलंबाची शक्यता

**» मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्प महत्त्वाकांक्षी असला तरी सध्या तो प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्याच्या टप्प्यावर आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सल्लागाराची नियुक्ती केली जाईल. त्यानंतर प्रकल्पाचे नियोजन, तांत्रिक तपासणी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीची प्रक्रिया सुरु होणार आहे. त्यामुळे नदी प्रदूषण नियंत्रणाच्या प्रत्यक्ष कामाला आणखी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. पुणेकरांचे लक्ष आता प्रकल्पाच्या पुढील हालचालींकडे लागले आहे.**

### नदी प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना

**» मुळा-मुठा नदीतील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी पीएमआरडीएकडून विविध उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. दूषित पाणी नदीत जाण्यापूर्वी त्याचे संकलन करण्यासाठी मलवाहिन्या टाकण्यात येणार आहेत. आवश्यक ठिकाणी एसटीपी उभारण्याचे नियोजन आहे. जलपर्णी निर्मूलन आणि घनकचरा व्यवस्थापनावरही भर दिला जाणार आहे. या माध्यमातून नदीतील प्रदूषणाचे प्रमाण कमी करून जलस्रोतांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.**

### सल्लागार नियुक्तीसाठी ई-निविदा

**» 'मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण योजनेच्या पुढील प्रक्रियेसाठी पीएमआरडीएने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. निविदा दस्तऐवज ११ ऑगस्ट २०२६ पासून डाउनलोड करता येणार असून, निविदा सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत आहे. सल्लागार नियुक्त झाल्यानंतर प्रकल्पाच्या तांत्रिक आणि प्रशासकीय कामांना वेग येण्याची अपेक्षा आहे.**

# पुणेकरांच्या खिशाला कात्री! रिक्षा प्रवासाबरोबरच रुग्णवाहिकांची सेवाही महागणार

## पुण्यात 1 सप्टेंबरपासून रिक्षा आणि रुग्णवाहिकांच्या प्रवासासाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. आरटीएने नवीन भाडेवाढीला मंजुरी दिलीकेली

**पुणे | प्रतिनिधी**

माळशेज घाट-भोरांडे पंप्ड स्टोरेज प्रकल्पासाठी येत्या २१ ऑगस्ट रोजी पर्यावरणीय जनसुनावणी घेण्यात येणार आहे. पुणे आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाची जनसुनावणी ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील धसई येथे होणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) याबाबत कार्यालयीन आदेश काढून जनसुनावणी पॅनेल निश्चित केले आहे.

पुण्यातील माळशेज घाट-भोरांडे पंप्ड स्टोरेज प्रकल्पाची क्षमता १ हजार ५०० मेगावॅट आहे. पंप्ड स्टोरेज प्रकल्पामध्ये पाण्याचा वापर करून वीज साठविण्याची आणि विजेची गरज वाढल्यानंतर तिचे उत्पादन करण्याची व्यवस्था केली जाते. हा प्रकल्प पुणे आणि ठाणे जिल्ह्यांशी संबंधित असून त्याचा प्रस्ताव अदानी रिन्युएबल एनर्जी फिफ्टी-टू लिमिटेड यांच्याकडून देण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या अधिसूचनेनुसार तसेच १ डिसेंबर २००९ रोजीच्या सुधारित अधिसूचनेनुसार, या प्रकल्पासाठी जनसुनावणी पॅनेल निश्चित करण्यात आले आहे. पॅनेलमध्ये ठाणे जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या प्रतिनिधींपैकी उपविभागीय दंडाधिकारी पदापेक्षा कमी दर्जाचा अधिकारी अध्यक्ष म्हणून राहणार आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कल्याण येथील प्रादेशिक अधिकारी सदस्य, तर एमपीसीबीचे कल्याण-३ येथील उपप्रादेशिक अधिकारी संयोजक म्हणून काम पाहणार आहेत. पर्यावरणीय मंजुरीच्या प्रक्रियेतील महत्त्वाच्या टप्प्यांपैकी ही एक जनसुनावणी आहे. या सुनावणीत प्रकल्पाबाबत स्थानिक नागरिक, संबंधित घटक आणि प्रशासनासमोर पर्यावरणाशी निगडित मते, सूचना तसेच हरकती मांडण्याची संधी आहे. एमपीसीबीने नियुक्त केलेले पॅनेल ही सुनावणी घेणार आहे.



### १,५०० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प

**» पुणे आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये प्रस्तावित असलेल्या माळशेज घाट-भोरांडे पंप्ड स्टोरेज प्रकल्पाची क्षमता १,५०० मेगावॅट आहे. पाण्याचा वापर करून वीज साठवणे आणि मागणी वाढल्यानंतर वीज निर्मिती करणे, अशी या प्रकल्पाची कार्यपद्धती आहे. प्रकल्पाचा प्रस्ताव अदानी रिन्युएबल एनर्जी फिफ्टी-टू लिमिटेडने दिला आहे.**